राज्याच्या औद्योगिक धोरणास अनुसरुन स्थापन करण्यात आलेल्या मैत्री कक्षाच्या कामकाजाबाबत वृत्तपत्रात जाहिरातीव्दारे प्रचार व प्रसार खर्चास मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय, क्र.मेइम-२०१७/प्र.क्र. २७९ /उद्योग-८,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक - २८ डिसेंबर, २०१७

<u>वाचा</u>:- १) शासन निर्णय क्र.इ बीज-२०१३/ प्र.क्र.११७/ उद्योग-८ दिनांक १/३/२०१४
२) शासन निर्णय क्र. मेइम-२०१५/ प्र.क्र.१०५ / उद्योग-८ दिनांक ११/२/२०१६
३) उद्योग संचालनालय पत्रक्र.उ.सं./मैत्री२/जाहिरात देयके प्रस्ताव/२०१७/अे-१५८८, दि.२४.०८.२०१७

<u>प्रस्तावना</u>:-

राज्याच्या औद्योगिक धोरणास अनुसरुन गुंतवणुकदारांना सहाय्य करण्यासाठी शासनाने दि.२७.२.२०१४ पासून मुंबई येथे एकात्मिक सुलभता कक्ष (Integrated Facilitation Center) महाराष्ट्र उद्योग,व्यापार आणि गुंतवणुक सुविधा केंद्र (मैत्री) स्थापित केला आहे. सदर मैत्री कक्षामार्फत एक खिडकी संकल्पनेतंर्गत गुंतवणुकदारांना सर्व सेवा, माहिती व मार्गदर्शन एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देण्यात येते. जेणेकरुन राज्याचा सुलभ व समतोल औद्योगिक विकास होऊन अधिकाधिक गुंतवणुक राज्यात आकर्षित होईल. सदर मैत्री कक्षाची प्रसिध्दी होण्यासाठी दूरचित्रवाणी, आकाशवाणी, सामाजिक माध्यमे, ऑडिओ, इंटरनेट इ. वर जाहिरात देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे. त्यानुसार सदर जाहिरातींसाठीचा कृती व आराखड्याबाबत माहिती व जनसंपर्क संचालनालय यांच्या मान्यतेने खर्चाचा प्रस्ताव उद्योग संचालनालयाने दि. २४/०८/२०१७ च्या पत्रान्वये सादर केला आहे. सदर प्रस्तावानुसार मैत्री कक्षाच्या प्रसिध्दी व प्रसारासाठी विविध वृत्तपत्रात देण्यात आलेल्या जाहिरातीवरील खर्चास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णय</u>:-

मैत्री कक्षाची प्रसिध्दी व प्रसार होण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या समन्वयाने खालील नमूद करण्यात आलेल्या वर्तमानपत्रात EODB अंतर्गत विविध विभागांनी हाती घेतलेले Reforms, मैत्री कक्षांतर्गत उपलब्ध Single Window सुविधा इ.बाबतची माहिती देण्याऱ्या जाहिराती त्यापुढे दर्शविण्यात आलेल्या तारखांना प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. तसेच दर प्रमाणपत्रामध्ये निश्चित करण्यात आलेल्या प्रति चौ.से.मि.च्या दरानुसार देयकांची रक्कम दर्शविण्यात आली आहे.

सदर जाहिरातींसाठी एकूण खर्च रु. ०३,३८,२४०/- इतका असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे नमुद केला आहे :-

अ. क्र.	**वृत्तपत्राचे ना**	**आवृत्ती**	**जाहिरातीचा दिनांक**	**दर प्रमाणपत्रानुसार दर (प्रति चौ.सें.मि.)/ रंगीत जाहिराती करीता ४०% अति.)**	**देयकाची रक्कम (८०० चौ.सें.मि.करीता)**	**शेरा**
१	दै.पुढारी	कोल्हापूर	दि.२७.०४.२०१७	४३/-	४८१६०.००	
२	दै.सकाळ	पूणे	दि.२७.०४.२०१७	६२/-	६९४४०.००	
३	दै.लोकमत	अकोला/नागपूर/ औरंगाबाद	दि.२७.०४.२०१७	२८/-,५८/-,व ४७/-	१४८९६०.००	
४	दै.लोकसत्ता	मुंबई	दि.२९.०४.२०१७	४०/-	४४८००.००	
५	दै.इंडियन एक्सप्रेस (इंग्रजी)	मुंबई	दि.२९.०४.२०१७	२४/-	२६८८०.००	
				एकूण	**३,३८,२४०/-**	

मैत्री कक्षाच्या प्रसिध्दी व प्रसारासाठी उपरोक्त नमूद करण्यात आलेल्या विविध वृत्तपत्रातील जाहिरातीवरील खर्च रु. **३,३८,२४०/-** (अक्षरी रु. तीन लक्ष अडोतीस हजार दोनशे चाळीस फक्त) खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर मागणीपोटी होणारा खर्च “मागणी क्र. के-७, मुख्य लेखाशीर्ष-२८५२, उद्योग, ८०, सर्वसाधारण, १०२ औद्योगिक उत्पादकता, (००) (१५) "मैत्री कक्षाकरिता खर्च (योजनांतर्गत) २८५२ A ०२२) ” या लेखाशीर्षाखाली सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षातील मंजूर केलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

३. सदरची तरतूद आहरित करण्यासाठी लेखाधिकारी, उद्योग संचालनालय, मुबई यांना आहरण व संवितरण अधिकारी व विकास आयुक्त (उद्योग) यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदर निधीच्या विनियोगाबाबत तसेच महालेखापाल यांच्या लेख्याशी खर्च ताळमेळ घालण्याची कार्यवाही करावी. सदर निधी प्रत्यक्षात वितरित झाल्यानंतर खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापाल यांना पाठवून त्याची प्रत शासनास सादर करण्याची जबाबदारी नियंत्रक अधिकाऱ्याची राहील.

४. हा शासन निर्णय शासन आदेश वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग-२ दिनांक १७/४/२०१५ अन्वये सुधारित केलेल्या वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग पहिला, उप विभाग २ मधील अनुक्रमांक -८ नियम क्र. १७ अ अनुसार प्रशासकिय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१७१२२८१५२४२९०२१० असा आहे. हा आदेश डीजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशांनुसार व नावाने,

Sanjay Shankarrao Ingle

Digitally signed by Sanjay Shankarrao Ingle
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f0d616600e4d2f510d1c8cc19813e070ad282d2275bf6fc132a2dee97f14e0a6, serialNumber=d337930b14433dc62c0154af2bbc60bb5a6edcaa66b7f34596c50a27eb0f6333, cn=Sanjay Shankarrao Ingle
Date: 2017.12.28 15:30:01 +05'30'

(संजय इंगळे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई-३२.
२) महसंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई / नागपूर.
४) संचालक, लेखा व कोषागारे, संगणक शाखा, नवीन प्रशासन भवन, मुंबई-३२.
५) सहायक संचालक, (वित्त व लेखा), उद्योग संचालनालय, मुंबई.
६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई, /निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
७) कक्ष अधिकारी, वित्त विभाग (व्यय-१६ / अर्थसंकल्प-१४), मंत्रालय, मुंबई-३२.
८) कक्ष अधिकारी, प्रशासन-१, उ.ऊ. व का.वि., मंत्रालय, मुंबई-३२.
९) प्रधान सचिव (उद्योग), यांचे स्वीय सहायक, उ.ऊ. व का.वि., मंत्रालय मुंबई.
१०) निवड नस्ती (उद्योग-८).